सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२९ | शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





**प्रा.डॉ.श्री. एस. आर. चौधरी**
निवृत्त प्राचार्य



**ॲड. सौ. भारती अग्रवाल**
अमळनेर



**श्री. श्याम सोनवणे**
पत्रकार

# बारामतीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## पूत्र पार्थ आणि जय पवार यांनी दिला मुखाग्नी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पार्थ आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जनसागर लोटला होता.

ना. अजितदादा पवार यांच्या निधनाने अवघ्या महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. ना. अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप देताना पक्षाच्या नेत्यांना अश्रू अनावर झाले होते. राज्यभरातील कार्यकर्त्यांनी साश्रू नयनांनी अंतिम निरोप दिला. अजितदादा परत या..अजितदादा अमर रहे..एकच वादा अजितदादा असे म्हणत कार्यकर्त्यांनी टाहो फोडला होता.

केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शहा, केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्य सरकारमधील मंत्री, खासदार आणि आमदारांनी श्रद्धांजली अर्पण केली. पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी राज्यासह देशातील प्रमुख नेत्यांसह लाखोच्या संख्येने जनसमुदाय लोटला होता. राज्यभरातून विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ना. अजितदादा पवार अनंतात विलीन!



बारामती : ना. अजितदादा पवार यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी मुखाग्नी देताना पार्थ व जय पवार.











अमळनेर : आमदार अनिलदादा पाटील यांच्या निवास स्थानाजवळील मोकळ्या मैदानात (स्व.) उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अंत्यसंस्काराचे लाईव्ह प्रक्षेपण पहाताना सौ. जयश्रीताई पाटील. शेजारी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते. दुसऱ्या छायाचित्रात डिजिटल स्क्रीनवर सुरू असलेले लाईव्ह प्रक्षेपण. शेवटच्या छायाचित्रात (स्व.) ना. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करताना सौ. जयश्रीताई पाटील.

# (स्व.) अजितदादा पवार यांना अमळनेरात सामूहिक श्रद्धांजली

## शेकडो कार्यकर्त्यांनी डिजिटल स्क्रीनद्वारे घेतले अंत्यदर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे उपमुख्यमंत्री (स्व.) ना. अजितदादा पवार यांना गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी दुपारी आमदार अनिलदादा पाटील यांच्या निवासस्थानी सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बारामती येथे झालेल्या अंत्ययात्रेचे शेकडो कार्यकर्त्यांनी डिजिटल स्क्रीनद्वारे दर्शन घेऊन लाडक्या नेत्यास अखेरचा निरोप दिला. यावेळी अत्यंत भावनाशील वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांच्यासह शेकडो महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, इम्रान खाटीक, पत्रकार पांडुरग पाटील, शेखर पाटील, विजय शेखनाथ पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, शरद सोनवणे, विनोद कदम, भाऊसाहेब पाटील, शिवाजीराव पाटील आदींनी आपल्या भावना व्यक्त करताना अजितदादां सोबतच्या आठवणीना उजाळा दिला. यावेळी अनेकांचे डोळे पाणावले होते. अखेरचा मुखाग्नी देईपर्यंत सारेच जण स्क्रीन समोर स्तब्ध होते. "अजित दादा अमर रहे"च्या घोषणा देण्यात आल्या. अजितदादा यांच्या प्रतिमेसमोर पुष्प अर्पण करण्यात आले. सामूहिक शांतीमंत्र म्हणून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी जि. प., पं.स, बाजार समितीचे आजी- माजी पदाधिकारी, आजी- माजी नगरसेवक, आजी- माजी सरपंच, विकासो चेअरमन, राष्ट्रवादी तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान आमदार अनिल पाटील हे अमळनेर येथे आल्यानंतर सर्वपक्षीय शोकसभा घेणार असल्याची असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### आमचा बाप गेला : आमदार अनिलदादा पाटील



अजितदादा पवार यांच्या निधनानंतर प्रचंड हादरलेले आमदार अनिलदादा पाटील हे बारामती येथेच होते. कुणासोबतही बोलण्याच्या मनस्थितीत ते नव्हते. मात्र, अंत्ययात्रेनंतर मीडियासमोर येऊन त्यांनी अश्रूंनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. आमचा बाप गेला, आम्ही आता कुणाकडे पाहायचे, कुणाकडे व्यथा मांडायच्या, माझ्या मतदारसंघात विकासाची एक- एक वीट अजितदादांनीच रचलेली आहे. दर मंगळवारी आम्हा सर्व आमदारांना ते बोलावून समस्या जाणून घ्यायचे. आता कुणाकडे आम्ही त्या मांडायच्या. कधी स्वप्नातही वाटले नव्हते की असे काही घडेल. मात्र, नियतीने घात केला या शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या.

# मिलचाळ परिसरातील गटारी तुंबल्या

## आरोग्य धोक्यात; पालिकेने लक्ष देण्याची गरज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रेल्वे स्थानकाजवळील मिलचाळ भागात गटारी सांडपाण्याने तुंबल्या आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

गटारींमधून वाहणारे सांडपाणी, आजूबाजूला साचलेला कचरा व उघडा नाले यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. डासांची उत्पत्ती वाढली आहे. अनेकांना साथीचे आजार झाल्याचे नागरिकांमधून ओरड होत आहे. गटारींमध्ये प्लास्टिक पिशव्या, खाद्यपदार्थांचे रिकामे रॅपर आदींमुळे गटारी ब्लॉक झाल्या आहेत. या परिसरात रोज शेकडो प्रवाशी, स्थानिक नागरिक, विद्यार्थ्यांची वर्दळ असते. उघड्या गटारींमुळे ये- जा करणाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. वृद्ध नागरिकांना याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवण्याची जबाबदारी पालिका प्रशासनाची असताना त्यांचे याकडे कमालीचे दूर्लक्ष होत झाले आहे.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

*अमळनेर : मिलचाळ भागातील तुंबलेली गटार व कचरा.*

# पालिका निवडणूक वचननाम्याची अंमलबजावणी

## विवाह नोंदणी पुन्हा पालिकेकडे वर्ग करण्यासाठी पुणे येथे पाठपुरावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी आमदार शिरीषदादा चौधरी व नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी निवडणुकीत वचननामा प्रसिद्ध केला होता. त्यांनी दिलेल्या वचनपूर्तीची सुरुवात झाली असून, पालिकेकडे विवाह नोंदणी पुन्हा वर्ग करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. नगरसेविका कल्पना शर्मा तसेच माजी नगरसेवक मुन्ना शर्मा यांनी पुणे येथे उपसंचालकांची भेट घेतली.



यावेळी ग्रामीण रुग्णालयांमध्ये क्यूआर कोड प्रणाली उपलब्ध नसणे, काही डॉक्टरांकडून येणाऱ्या तक्रारी या बाबींबाबत चर्चा झाली. या अडचणी दूर करण्यासाठी गेल्या दोन- तीन वर्षांपासून प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, अपेक्षित यश अद्याप मिळाले नसल्याचे सांगण्यात आले. संबंधित विषयाची फाईल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात येणार असल्याचे उपसंचालकांनी आश्वासन दिले. तसेच माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी नगरविकास मंत्र्यांकडे विशेष पाठपुरावा केल्यास हा विषय तात्काळ अमळनेर पालिकेकडे वर्ग होईल, असेही सांगण्यात आले. पुढील टप्प्यात माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या समवेत शिष्टमंडळ उपमुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे यांची भेट घेणार आहेत. जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार विवाह नोंदणीचा अधिकार त्वरित पालिकेकडे आणण्यासाठी ठोस व प्रभावी पाठपुरावा करण्यात येणार आहे.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दिनविशेष
३० जानेवारी

- पंडित रविशंकर यांना भारतरत्न जाहीर.
- जागतिक आरोग्य संघटनेने कोविड-१९ साथीला आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केले.

### सीसीटीव्हीमुळे दुचाकीचोर जाळ्यात

अमळनेर : शहरातून मोटारसायकल चोरीस जाण्याचे प्रकार वाढले होते. पोलिसांनी सीसीटीव्ही कार्यरत ठेवले आहेत. त्यांनी फुटेज तपासणी केली असता एक अल्पवयीन मुलगा व दुसरा तरूण एका मोटारसायकलवर येताना दिसले. अल्पवयीन मुलाने मोटारसायकल चोरल्याचे दिसून आले. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, हवालदार मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, नीलेश मोरे आदींना आरोपीचा शोध घेण्यासाठी पाठविले होते. पोलीसांनी तांत्रिक साह्याने मोबाईल क्रमांक शोधून त्यांना ताब्यात घेतले. अरबाज शेख साजीद मणियार (वय २८) याला अटक केली. दुसरा अल्पवयीन आरोपीला तंबी देवून सोडून दिले.

# सोने १२ हजारांनी महाग, तर चांदीने केला ४ लाखांचा टप्पा पार

## सोने- चांदीचा नवा उच्चांक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक स्थरावरील राजकीय आणि आर्थिक तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित गुंतवणुकीला मागणी वाढली आहे. तसेच अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या 'जैसे थे' रेपो दराच्या निर्णयानंतर गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी सोन्या- चांदीच्या भावात मोठी वाढ झाली आहे. सोन्याचा भाव सुमारे १२ हजारांनी वाढला आहे. चांदीने ४ लाखांचा टप्पा पार केला आहे.

**सोन्याचा १. ७५ लाखांचा टप्पा पार**

आकडेवारीनुसार गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी राजधानी दिल्लीच्या सराफ बाजारात २४ कॅरेट सोन्याचा भाव तब्बल प्रति १० ग्रॅम रुपये १, ७९, ००० झाला आहे, तर २२ कॅरेटचा भाव १, ६४, १०० रुपये आहे.
जागतिक बाजारात स्पॉट गोल्डचा भाव २. १ टक्के वाढून प्रति औंस $५, ५११. ७९ झाला आहे. ४ दिवसांपूर्वी सोमवारी पहिल्यांदाच सोन्याचा भाव $५,००० च्या वर गेला होता. त्यानंतर या आठवड्यात आतापर्यंत सोन्याच्या किमतींमध्ये तब्बल १० टक्केपेक्षा अधिक वाढ झाली आहे.



**चांदी ४ लाखांच्या पुढे**

दिल्लीच्या सराफ बाजारात चांदी प्रति किलो ४, १०, ००० रुपये झाला आहे. दिल्ली इतकाच भाव मुंबई, कोलकाता आणि पुणे शहरांमध्ये आहे. दरम्यान, आज स्पॉट सिल्वरचा भाव १. ३ टक्के वाढून प्रति औंस $११८. ०६१ झाला आहे. सोन्याच्या तुलनेत स्वस्त पर्याय म्हणून गुंतवणूकदारांची वाढती मागणी, पुरवठ्यातील तुटवडा आणि मोठ्या प्रमाणात खरेदी यामुळे चांदीचा भाव वाढत आहे.

**राज्यातही सोने-चांदी सुसाट**

१ जानेवारीला १० ग्रॅम सोने घेतले असते तर आतापर्यंत त्यावर ४४, ००० रुपयांचा रिटर्न मिळाला असता एवढी मोठी भाववाढ सोन्यात झाली आहे. तर एक किलो चांदीने तब्बल १, ७०, ००० रुपयांचा रिटर्न दिला असता असे तुलनेतून दिसून येते. मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव आणि अमरावती येथे २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति तोळा १, ७८, ८५० रुपये आहे तर २२ कॅरेटचा भाव १, ६३, ९५० रुपये आहे. त्यासोबतच चांदीचा भाव प्रति किलो ४,१०, ००० रुपये आहे.




# उध्वस्त तारे– तारका..!







पैशाच्या राशीवर लोळणारे, प्रसिद्धीच्या झगमगाटात तळपणारे, लावण्यवती नायिकांच्या प्रेमाला पात्र असणारे, हे तेजस्वी तारेदेखील माणूसच असतात. तारकांची सुद्धधा सारखी स्थिती!

माणसाचे दुबळेपण, त्याची नियती, भलेबुरे गुणदोष, आशा– निराशा हे सर्व काही यांच्याही वाट्याला आलेले असते. पडद्यावरचे हे स्वप्नाचे सौदागर सतत सुंदर, पण भयानक स्वप्नातच वावरत असतात. प्रत्यक्षात ही स्वप्न फुटून त्यांचा चुरा हाती आला की, ते एकदम मोडून पडतात, उध्वस्त होतात. उपेक्षा, तिरस्कार, अपयश हे स्वीकार करणे त्यांना अशक्य होते. शेवटी ते व्यसनांच्या आहारी जातात, तर काही केवळ दुर्दैवाची शिकार ठरतात. कलावंताच्या वाट्याला आलेली शोकांतिका, त्यातच त्यांचा झालेला शेवट अत्यंत वेदनदायी ठरतो.

गुरुदत्तसारखा एखादा काव्यात्म वृत्तीचा, तरल संवेदनतेचा बुध्दीमान दिग्दर्शक, चित्रपटसृष्टीत 'प्यासा', 'काकज के फूल' सारखे दर्जेदार चित्रपट निर्माण करून इतिहास घडवितो. पण शेवटी व्यक्तीगत जीवनातील वैफल्यामुळे तो आत्मघात करून घेतो. तसेच चंदुलाल शहा सारखे अल्पशिक्षित पण बुद्धीमान लोक सिनेसृष्टीत आले, स्वतःचे स्टुडिओ उभे केले, निर्माते बनले, करोडो रुपये कमावले आणि शेवटी कफल्लक अवस्थेत जग साडून गेले.

जुगारात झालेले ७६ हजार रुपयांचे कर्ज, 'मोतीलाल' या नटावरील अमाप प्रेमापोटी एकरकमी फेडणारे चंदुलाल शहा स्वतः घोड्याच्या शर्यतीत लाखो रुपये कमावतात आणि गमावतात देखील.

मुंबईत मलबार हिलवर ज्याचे आलिशान निवास्थान होते. गर्व्हनरच्या जोडीला स्वतःची गाडी असण्याचे भाग्य ज्याला एकट्याला त्या काळात लाभले होते तो 'मास्टर निसार' शेवटी कामाठीपुऱ्यातल्या एका गलिच्छ चाळीतल्या खोलीत देह ठेवतो. मरतेसमयी दोन भांडी, चार कपडे आणि त्याच्या काळातल्या भूमिकांच्या फोटोचे पिवळे पडलेले जुनाट अल्बम, एवढीच काय ती शिल्लक तो ठेवून गेला.

ओबड धोबड चेहऱ्याच्या रोख मुख्तारसारख्या सुमार नटाने मोठ्या हिंमतीने 'नूरजहाँ' नावाचा चित्रपट काढला. त्यावरच कर्ज फिटले नाही म्हणून पाकिस्तानात रिळ घेऊन पळून गेला. तिथे वितरकांच्या दारावर फेऱ्या मारून दमला आणि एके दिवशी हताश अवस्थेत जगाचा निरोप घेतला. त्याच्या निधनानंतर मात्र नूरजहाँचे वितरण झाले. तो रिलीज झाला. त्याने अक्षरशः धो– धो पैसा कमावला. याला दैवदुर्विलास नव्हे तर काय म्हणणार!

तसेच जिच्या नृत्याशिवाय चित्रपट अपूर्ण वाटत असे. त्या 'कक्कू' नावाच्या अभिनेत्रीने निर्धन, उपेक्षीत अवस्थेत मृत्यूला कवटाळले. आपल्या भरदार आवाजात ज्याने एक काळ गाजवला तो अभिनेता 'जयंत' (स्व. अमजद खाननचे वडील) घशाच्या कॅन्सरने मरण पावला. अशी अनेक उदाहरणे आहेत. या उदाहरणांवरून हिंदी चित्रपट व्यवसायातील क्रूरपणा, हृदयशून्यता, अनिश्चितता व माणुसकीचा अभाव याच बेगडी विदारक भावनाशून्य चित्रच समोर येते.

काही कलावंतांना ही चित्रपटसृष्टी मानवली, ते यशस्वी झाले. त्या काळी काहींनी सिनेसृष्टीत येण्याची वेळ अचूक साधली तर काही चुकून आले. उदा. सुशिक्षीत सुसंस्कृत व सभ्य बलराज सहानी तसेच हिरो म्हणून नाही तर चरित्र अभिनेता म्हणून प्रचंड यशस्वी व लोकप्रिय 'दादामुनी' अर्थात अशोककुमार, टवटवीत व चिरतरूण देव आनंद, सौदर्यवती वीणा, खानदानी रूपवती मधुबाला, बुद्धीमान व व्यावहारिक नर्गिस शिवाय सुंदर चेहरा, सहज अभिनय, धीर गंभीर व मादक संवाद फेकीने घायाळ करणारी मीनाकुमारी आदींनी यश– अपयशासह स्वतःची कारकीर्द गाजवली व रसिकांना झिझवले. मोहमयी, काल्पनिक, आभासी व स्वप्नवत भासणाऱ्या सिनेसृष्टीचे सत्य मांडताना प्रसिद्ध कवी व गीतकार (स्व.) साहिर म्हणतात, की 'ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है...!

**– शरद आ. सोनवणे,**
**९४२०१०८३०५**

# साधारण गांव को ज्ञान का केंद्र बनाने वालें पद्म श्री अंके गौड़ा

सक्सेस स्टोरी





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कर्नाटक के मांड्या ज़िले के छोटे से गांव हरलहल्ली में रहने वाले अंके गौड़ा को भारत सरकार ने पद्म श्री सम्मान से सम्मानित किया है। वजह है उनका वह असाधारण कार्य, जिसने एक साधारण गांव को ज्ञान का केंद्र बना दिया।


अंके गौड़ा का जीवन एक साधारण शुरुआत से आगे बढ़ता है। युवावस्था में वे बस कंडक्टर के रूप में काम करते थे। उसी समय किताबों के प्रति उनका प्रेम गहराता गया और यही शौक़ आगे चलकर उनका जीवन लक्ष्य बन गया। उन्होंने कन्नड़ साहित्य में मास्टर डिग्री हासिल की और नौकरी के साथ-साथ बड़ा हिस्सा किताबें खरीदने में लगा दिया।


किताबों के लिए उनका समर्पण इतना गहरा था कि अपने संग्रह को बढ़ाने के लिए उन्होंने मैसूर स्थित अपनी निजी संपत्ति तक बेच दी। पत्नी विजयलक्ष्मी और बेटे सागर के सहयोग से उन्होंने अपने गांव हरलहल्ली में करीब २० लाख किताबों की विशाल लाइब्रेरी खड़ी कर दी। इस लाइब्रेरी में बड़ी संख्या में दुर्लभ विदेशी पुस्तकें, विभिन्न भाषाओं के शब्दकोश और शोध से जुड़ा समृद्ध साहित्य मौजूद है। आज यह लाइब्रेरी केवल छात्रों के लिए नहीं, बल्कि शोधकर्ताओं, लेखकों और उच्च पदों पर कार्यरत लोगों के लिए भी ज्ञान का भरोसेमंद केंद्र बन चुकी है। यहां तक कि सुप्रीम कोर्ट के न्यायाधीश भी संदर्भ पुस्तकों के लिए इस लाइब्रेरी में आते हैं। सबसे खास बात यह है कि यहां पढ़ने के लिए कोई शुल्क नहीं लिया जाता।

अंके गौड़ा का मानना है कि शिक्षा और ज्ञान पर किसी एक वर्ग का अधिकार नहीं होना चाहिए। उनकी यही सोच और निस्वार्थ सेवा उन्हें पद्म श्री सम्मान तक ले आई। यह कहानी दिखाती है कि सच्ची लगन और सेवा भाव से एक व्यक्ति भी समाज की तस्वीर बदल सकता है।

# सोनं–चांदी गुलाबी कागदातच का गुंडाळून देतात?

जाणून घ्या काय आहे सिक्रेट ?





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकदा सोने किंवा चांदी घेण्यासाठी दुकानात गेल्यावर सोने खरेदीनंतर ते गुलाबी रंगाच्या कागदामध्ये का देतात? ९९ टक्के लोकांना याचे कारण माहिती नाही. जाणून घेऊयात काय आहे सिक्रेट ?

भारतामध्ये पिढ्यान पिढ्या एक गोष्ट अगदी हमखास पाहायला मिळते. ती म्हणजे सोने किंवा चांदी खरेदी करताना ते गुलाबी कागदात लपेटून देणे. लहान शहरांमधील पारंपरिक सोनार असोत किंवा मोठ्या ब्रँडेड ज्वेलरी शोरूम्स, ही परंपरा आजही तशीच सुरू आहे. बहुतांश ग्राहक याकडे केवळ सवय किंवा साधी पॅकिंग पद्धत म्हणून पाहतात. मात्र, या गुलाबी कागदामागे शास्त्र, मानसशास्त्र, सुरक्षितता आणि धार्मिक श्रद्धा यांचा अनोखा संगम दडलेला आहे. जेव्हा एखादा ज्वेलर सोन्याची अंगठी, हार किंवा बांगडी फिकट गुलाबी कागदात ठेवून दाखवतो, तेव्हा तो नकळतपणे ग्राहकाच्या डोळ्यांवर आणि मेंदूवर परिणाम करत असतो.

तज्ज्ञांच्या मते, हा हलका गुलाबी शेड सोन्याच्या पिवळ्या झगमगाटाला संतुलित करतो. त्यामुळे सोने फारच पिवळट किंवा भडक न दिसता अधिक रॉयल, क्लासी आणि महागडे वाटते. याच कारणामुळे तोच दागिना गुलाबी कागदात पाहिल्यावर अधिक आकर्षक भासतो.

मानसशास्त्रज्ञ सांगतात की गुलाबी रंग पाहणाऱ्याच्या मनात 'नवीन, शुद्ध आणि सौम्य' असा भाव निर्माण करतो. त्यामुळे दागिना पाहताना ग्राहकाला एक वेगळाच समाधानाचा आणि विश्वासाचा अनुभव मिळतो. हा गुलाबी कागद फक्त दिसायला सुंदर नसतो तर तो अत्यंत मऊ असतो. त्यामुळे दागिन्यांची ने-आण करताना त्यावर रेगा पडण्याची शक्यता कमी होते. विशेषतः सोने आणि चांदीसारख्या मऊ धातूंसाठी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

# डायबिटीस रुग्णांसाठी 'एबीएवनसी' चाचणी का आवश्यक?




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मधुमेहाचे वाढते प्रमाण लक्षात घेता, रक्तातील साखरेवर दीर्घकालीन नियंत्रण ठेवण्यासाठी 'एबीएवनसी' चाचणी अत्यंत निर्णायक ठरत आहे, असा सल्ला आरोग्यतज्ज्ञांनी दिला आहे. डायबिटीस रुग्णांसाठी 'एबीएवनसी' चाचणी का आवश्यक? तज्ज्ञांनी दिला इशारा, दुर्लक्ष करू नका.

रक्तातील साखर नियंत्रणात ठेवल्याने हृदय, डोळे आणि मूत्रपिंडांचे संरक्षण होते. तसेच स्वादुपिंडाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. मधुमेह नियंत्रणासाठी 'एबीएवनसी' ही तपासणी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. 'एबीएवनसी' चाचणीमुळे मागील २ ते ३ महिन्यांतील रक्तातील साखरेची सरासरी पातळी समजण्यास मदत होते. तज्ज्ांच्या मते, 'एबीएवनसी' नियंत्रणात ठेवल्यास मधुमेहामुळे होणाऱ्या हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार, डोळ्यांचे विकार आणि मज्जासंस्थेच्या समस्या टाळता येऊ शकतात. योग्य 'एबीएवनसी' पातळी असल्यास रुग्ण अधिक सक्रिय, तणावमुक्त आणि दर्जेदार जीवन जगू शकतो. मात्र, या पातळीमध्ये सातत्याने वाढ होत राहिल्यास जीवनमानावर गंभीर परिणाम होऊ शकतात. 'एबीएवनसी' नियंत्रणासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, वजन नियंत्रणात ठेवणे, औषधांचे नियमित सेवन करणे आणि वेळोवेळी आरोग्य तपासण्या करणे गरजेचे आहे. तज्ज्ञांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास मधुमेह प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो, असेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

ज्या लोकांची 'एबीएवनसी' पातळी ७ टक्केपेक्षा कमी असते. त्यांना उच्च पातळी असलेल्या लोकांच्या तुलनेत स्वादुपिंडाचा कर्करोग होण्याची शक्यता कमी असते. तुमची 'एबीएवनसी' पातळी प्रत्येक १ टक्केने वाढल्यास, तुमच्या स्वादुपिंडाला असलेला धोका जवळपास ५० टक्केने वाढतो. योग्य 'एबीएवनसी' पातळी ही तुमच्या शरीराचे 'संरक्षण' करते, अशी प्रतिक्रिया डॉ. चंद्रशेखर तुलसीगेरी (संचालक, क्रिटिकल केअर विभाग आणि प्रमुख ए अँड ई, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई) यांनी व्यक्त केली. 'एबीएवनसी' ७ टक्के पेक्षा कमी आणि उपाशीपोटी रक्तातील साखर १२६ एमजी/डीएल (७ एमएमओ/एल) किंवा त्यापेक्षा कमी राहिल याची खबरदारी घ्या. ही साध्य केल्यास तुमच्या शरीराला जास्तीत जास्त संरक्षण मिळते. तुमच्या डॉक्टरांना तुमच्या 'एबीएवनसी' पातळीबद्दल आणि ती ७ टक्केच्या जवळ आणण्यासाठी कोणती पावले उचलावीत याबद्दल विचारा. मधुमेहाचे व्यवस्थापन करणे म्हणजे केवळ 'गुंतागुंत' टाळणे नाही, तर ते तुमच्या जीवनाचे संरक्षण करण्याचा आणि कर्करोग सुरू होण्यापूर्वीच तो टाळण्याचा एक सक्रिय मार्ग आहे. तुमची 'एबीएवनसी' पातळी प्रभावीपणे कमी करण्यासाठी, 'ग्लुकोजमधील अचानक वाढ' टाळणाऱ्या सवयींवर लक्ष केंद्रित करणे सर्वोत्तम आहे. जेव्हा तुम्ही ही वाढ टाळता, तेव्हा तुमची एकूण सरासरी (एबीएवनसी) नैसर्गिकरित्या कमी होते, असे डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे.

# पलंगावर बसून जेवण केल्यास काय होऊ शकते?





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल लॅपटॉप किंवा मोबाईल पाहत पलंगावर बसून जेवणे ही अनेकांची फॅशन झाली आहे. मात्र, ही आरामदायी वाटणारी सवय तुमच्या शरीराला हळूहळू पोखरत आहे.

### पचनसंस्थेवर होतो गंभीर परिणाम

जेवताना ताठ बसणे आवश्यक असते. पलंगावर आपण वाकून बसतो, ज्यामुळे पोटावर दाब येतो आणि पचनक्रिया मंदावते. यामुळे गॅस आणि अपचनाचा त्रास होतो.

### ॲसिडिटी आणि छातीत जळजळ

आडवे होऊन किंवा पलंगावर लोळून खाल्ल्यास अन्न अन्ननलिकेत अडकण्याची शक्यता असते. यामुळे ॲसिड रिफ्लक्स, छातीत जळजळ आणि आंबट ढेकर येण्याचे प्रमाण वाढते.

### लठ्ठपणा आणि 'ओव्हरईटिंग'

स्क्रीनकडे पाहत जेवल्यामुळे आपण किती खातोय याकडे लक्ष राहत नाही. यामुळे 'माईंडफुल इटिंग' होत नाही आणि गरजेपेक्षा जास्त खाल्ल्याने लठ्ठपणा वाढतो.

### स्वच्छतेचा प्रश्न आणि बॅक्टेरिया

पलंगावर पडलेले अन्नाचे सूक्ष्म कण चादरी आणि गादीमध्ये अडकतात. त्यामुळे बुरशी, मुंग्या आणि जंतू वाढतात. ज्यामुळे त्वचेची ॲलर्जी किंवा इन्फेक्शन होऊ शकते.

### झोपेच्या गुणवत्तेत अडथळा

बेड ही विश्रांतीची जागा आहे. तिथेच जेवण आणि काम केल्यामुळे मेंदू गोंधळतो, परिणामी झोपेचे चक्र विस्कळीत होते आणि शांत झोप लागत नाही.

### आळशी जीवनशैलीचा धोका

पलंगावर बसून खाण्यामुळे शारीरिक हालचाल कमी होते. दीर्घकाळ ही सवय राहिल्यास मधुमेह आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

### योग्य पद्धत कोणती?

आरोग्य जपण्यासाठी नेहमी जमिनीवर किंवा डायनिंग टेबलवर ताठ बसून जेवा. जेवणानंतर लगेच झोपू नका, किमान १०– १५ मिनिटे शतपावली करा.

# नमकीन बिस्कीटांमध्ये छिद्रे का असतात ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नमकीन बिस्कीटांमध्ये छिद्रे असतात. मात्र, ही छिद्रे का असतात ? यामागील कारणे जाणून ? घेऊयात.

**वैज्ञानिक कारण :** अनेक लोकांना वाटते की बिस्किटांवरील छिद्र हे केवळ डिझाइनसाठी असतात. मात्र, ते चुकीचे आहे. या छिद्रांमागे एक खास तांत्रिक कारण असते.

**वाफ बाहेर जाण्यासाठी मार्ग :** बिस्किटे जेव्हा ओव्हनमध्ये बेक केली जातात, तेव्हा त्यातील गरम हवा आणि वाफ बाहेर जाणे आवश्यक असते. जर ही वाफ बाहेर गेली नाही, तर बिस्किटे फुगू शकतात किंवा त्यांचा आकार बिघडू शकतो. छिद्रांमुळे ही वाफ सहज बाहेर पडते आणि बिस्किटे चपटी राहतात.

**डॉकिंग होल्स :** बिस्किटांवरील या छिद्रांना तांत्रिक भाषेत 'डॉकिंग होल्स' असे म्हटले जाते. यामुळे बिस्किटे व्यवस्थित भाजली जातात आणि त्यांना त्यांचा खरा आकार मिळतो.


कुरकुरीतपणा टिकवण्यासाठी : नमकीन बिस्किटे कुरकुरीत असणे गरजेचे असते. छिद्रांमुळे बिस्किटांमधील ओलावा पूर्णपणे निघून जातो, ज्यामुळे ती जास्त वेळ क्रिस्पी आणि कुरकुरीत राहतात.

**मीठ आणि ओलावा :** नमकीन बिस्किटांमध्ये मिठाचे प्रमाण असते, जे हवेतील ओलावा लवकर शोषून घेते. हे बिस्किट लवकर सुकवण्यासाठी आणि कुरकुरीत बनवण्यासाठी त्यात अधिक छिद्र दिले जातात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# रोजगार निर्मितीत संख्याशास्त्र महत्वाचे

## दीपक महाजन; प्रताप महाविद्यालयात करिअरवर व्याख्यान




**अमळनेर : दीपक महाजन यांचे स्वागत करताना प्र. प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव व मान्यवर.**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : डेटावर आधारीत अचूक निर्णय घेण्यासाठी सांख्यिकीय तंत्राचा प्रभावी उपयोग केला जातो. रोजगार निर्मितीसाठी संख्याशास्त्र अत्यंत महत्वाचे आहे, असे प्रतिपदन दीपक महाजन यांनी केले.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय व रुसा अंतर्गत संख्याशास्त्र विभागातर्फे शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी आयटी क्षेत्रातील करिअरमध्ये संधी या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रा. अनुपम शिसोदे, प्रा. प्रणित सोनवणे, प्रा. कल्पेश पाटील, प्रा. प्रियांका बागुल, संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. उमेश येवले व्यासपीठावर होते. उपस्थित होते.

दीपक महाजन पुढे म्हणाले, की माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर टेस्टिंग, क्वालिटी कंट्रोल तसेच बिझनेस ॲनालिटिक्स आदी क्षेत्रात नोकरीच्या मोठ्या संधी आहेत. उद्योग क्षेत्रात स्टॅटॅटिक्समुळे अचूकता व कार्यक्षमता वाढविता येते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रकल्पांसाठी, डेटा विश्लेषण करताना याचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांनी 'एआय'चाही अभ्यास करावा. त्याचा योग्य तो उपयोग आपल्या क्षेत्रात करावा. यातून निश्चितच लाभ होईल.

प्राचार्य डॉ. जाधव यांनी संख्याशास्त्र विषयाचे शिक्षण, संशोधन व औद्योगिक क्षेत्रातील वाढते महत्त्व सांगितले. १६ जानेवारी रोजी झालेल्या विजेत्या स्पर्धकांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संख्याशास्त्र विभागातील निवृत्त प्राध्यापक प्रा. डॉ. पी. बी. भराटे, प्रा. जे. सी. अग्रवाल, वरिष्ठ निवृत्त प्रा. धर्माधिकारी आदी उपस्थित होते. प्रा. उमेश येवले यांनी प्रास्ताविक केले. प्रा.अश्विनी कोळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हेमांशु पाटील यांनी आभार मानले. गुणवंत वाघ, चंद्रकांत ठाकूर व दीपक चौधरींनी सहकार्य केले.











**अमळनेर : युवा कल्याण प्रतिष्ठानच्या जागर अभियानांतर्गत संविधान पत्रकाचे वाचन करताना तालुक्यातील नीम हायस्कूल, चौबारी हायस्कूल, शहरातील साने गुरुजी शाळेतील विद्यार्थी- विद्यार्थिनी व ग. स. बँकेतील अधिकारी, कर्मचारी.**

# संविधान पालन हीच खरी देशभक्ती!

## युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे विविध ठिकाणी पत्रक वाचन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे संविधान जागर अभियानांतर्गत संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ७ हजार ५०० संविधान पत्रके शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आले. प्रजासत्ताकदिनी सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी या पत्रकांचे ठिकठिकाणी वाचनही करण्यात आले. काही शाळांनी पत्रकातील माहितीच्या आधारे प्रश्न काढून परीक्षा घेतली व बक्षीसही वाटप करण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविले जात आहे.

संविधान कोणत्या विचाराने बनले आहे? संविधानाने आपल्याला काय दिले? संविधानाने आपल्या गावाला काय दिले? महिलांना काय दिले? संविधानाने शोषित वंचित घटकांना काय दिले? व संविधानाची उद्देशिका ही त्या पत्रकात प्रकाशित केली आहे. पत्रके तहसील कचेरी, पंचायत समिती, न्यायालय आदी परिसरात वाटण्यात आले. निवृत्त पोलीस सुनील महाजन, चोपडा समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा डॉ. राहुल निकम, अशोक बिऱ्हाडे, संजय पाटील, गौतम मोरे, योगेश पाटील, बापूराव ठाकरे व डी. ए. पाटील, यतीन पवार, राजकुमार पाटील आदींनी सहकार्य केले.

# डॉ. जयाजी नाथ यांचा नाथपंथी महासंघातर्फे सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयाजी नाथ मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत सलग सहाव्यांदा विजयी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर उत्तर महाराष्ट्र पदाधिकारी यांच्यातर्फे त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र सचिव योगेश बर्वे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल कानडे, नव नाथपंथी समाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रोहित कानडे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्षा सौ. शोभाताई शिंदे, महासंघ जिल्हाध्यक्ष बाळाकृष्ण जाधव, जळगाव जिल्हा युवक अध्यक्ष शुभम बुवा, संगमनेर तालुका महिला अध्यक्षा रूपाली आहेरकर आदी उपस्थित होते. काशीनाथ वरपे यांचे विशेष सहकार्य लाभले.



**मुंबई : डॉ. जयाजी नाथ यांचा सत्कार करताना योगेश बर्वे, अनिल कानडे, सौ. शोभाताई शिंदे आदी.**

# 'या' भाज्यांमध्ये चुकूनही टाकू नका टोमॅटो

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**हिरव्या पालेभाज्या :** मेथीची भाजी किंवा इतर काही पालेभाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर टाळावा टोमॅटोमधील आंबटपणामुळे पालेभाज्यांची नैसर्गिक चव आणि त्यांचा विशिष्ट सुगंध कमी होऊ शकतो. **दुधी भोपळा आणि कारले :** दुधी भोपळ्याची भाजी हलकी आणि गोडसर चवीची असते, टोमॅटोमुळे ती अति आंबट होऊ शकते. तसेच कारल्याच्या भाजीत टोमॅटो घातल्याने कारल्याचा नैसर्गिक कडूपणा आणि टोमॅटोचा आंबटपणा यांचे मिश्रण चव बिघडवू शकते. **भेंडीची भाजी :** भेंडीमध्ये टोमॅटो घातल्याने ती अधिक चिकट होण्याची शक्यता असते. भेंडी कुरकुरीत हवी असेल तर टोमॅटोऐवजी आमसूल किंवा लिंबाचा वापर करणे अधिक योग्य ठरते. **दही असलेली ग्रेव्ही :** ज्या भाज्यांमध्ये दह्याचा वापर मुख्य घटक म्हणून केला जातो (कढी किंवा काही विशेष ग्रेव्ही), तिथे टोमॅटो टाळणे गरजेचे आहे. दही आणि टोमॅटो दोन्ही आंबट असल्याने भाजीची चव प्रमाणाबाहेर आंबट होऊ शकते.**कडधान्यांची उसळ :** उसळीत जर तुम्हाला मूळ चव टिकवून ठेवायची असेल, तर टोमॅटोचा वापर मर्यादित ठेवावा.

# वत्साई एज्युकेशन संस्थेत ध्वजवंदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील वत्साई एज्युकेशन सोसायटी संचलित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व पर्ल इंटरनॅशनल स्कूल येथे प्रजासत्ताकदिनानिमित्त सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी विविध कार्यक्रम झाले. संचालिका मनस्वी भदाणे व विवेक भदाणे यांनी ध्वजवंदन केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत भदाणे, सचिव गायत्री भदाणे, संचालक धनः श्याम पाटील आदी प्रमुख अतिथी होते. पर्ल इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देश भक्ती वर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच इंग्लिश मॅरेथॉन स्कुल लेव्हल स्पर्धेत ९८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटाकविल्याबद्दल गुरु मोरे या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र व टॉफी देवून विशेष सत्कार करण्यात आला. कुमुद मगर व साई चौधरी या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. कुंजल पाटील, उष्कर्षा लोकंक्षी, वर्षा पाटील, प्रकाश पाटील, प्रमोद पाटील, समाधान शिरसाठ, विजय चौधरी, उमेश पाटील, सखाराम पावरा आदींनी सहकार्य केले.



**अमळनेर : ध्वजवंदन करताना मनस्वी भदाणे व विवेक भदाणे.**

# पुणे येथे श्री दधिमती माता प्राकट्य उत्सव उत्साहात

## अमळनेरचे मुन्ना शर्मांची उपस्थिती; जुन्या आठवणींना दिला उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पुणे येथील बालाजी मंदिरात दायमा समाजातर्फे श्री दधिमती माता प्राकट्य उत्सव नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुजी गोविंद गिरीजी महाराज यांचे लहान बंधू श्री. वल्लभजी अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी अमळनेर येथील नगरसेविका सौ. कल्पना शर्मा, सामाजिक कार्यकर्ते मुन्ना शर्मा यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

धार्मिक विधी, पूजा-अर्चानांद्वारे श्री दधिमती मातेस वंदन करण्यात आले. यावेळी मुन्ना शर्मा यांनी समाजाने एकसंघ राहावे. काळाची गरज ओळखून सर्व मारवाडी ब्राह्मण समाजाने एकत्र येऊन बेटी व्यवहार सुरू करावा. जेणेकरून समाजातील मुला-मुलींच्या विवाहाचा मार्ग सुलभ होईल, असे आवाहन केले. तसेच त्यांनी पुण्याशी संबंधित आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. नानाजी (कै.) चुनीलालजी महाराज (शेंदुर्णी वाले) यांच्यासोबत लहानपणी पुण्याला येत असताना बुधवार पेठ, विविध पेठा व दारूवाला पूल परिसरातील समाजबांधवांची घरे, विशेषतः (कै.) मोहनलालजी गोटेचा यांच्या घरातील आठवणींना त्यांनी उजाळा दिला. तसेच अलका टॉकीजमध्ये पाहिलेल्या चित्रपटांच्या आठवणींनी पुणेकरांना जुन्या काळात नेऊन ठेवले. या प्रसंगी सत्कार स्वीकारताना मुन्ना शर्मा भावनाविवश झाले होते. उत्सवात पुणे दायमा समाजाचे अध्यक्ष सुरेशजी, विठोदिया, जव्हारजी तिवारी, पवनजी दायमा, श्रीवल्लभजी, हरीवल्लभजी, दिनेशजी आसोपा आदी मान्यवर उपस्थित होते. विकेश तिवारी, सौ. तिवारी, सोनल कामठी, त्यांचे नातेवाईक निखिलजी दायमा, नितीनजी दायमा, आनंदजी दायमा आदी उपस्थित होते. मंदिराच्या पुजारी तसेच सुवर्णाताई दायमा यांचाही सत्कार करण्यात आला. पवन दायमा यांनी आभा मानले.




**पुणे : प्राकट्य उत्सवप्रसंगी अमळनेर येथील नगरसेविका सौ. कल्पना शर्मा व मुन्ना शर्मा यांचा सत्कार करताना श्री. वल्लभजी व मान्यवर.**

# वय फक्त २२ पण जबाबदारी अख्ख्या जिल्ह्याची!

## महाराष्ट्राचा अभिजीत पाटील राजस्थानचा सर्वात तरुण आयपीएस अधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची (युपीएससी) परीक्षा म्हणजे केवळ अभ्यास नव्हे, तर संयम, चिकाटी आणि आत्मविश्वासाची अंतिम कसोटी. अनेक उमेदवार वर्षानुवर्षे प्रयत्न करूनही अपयशी ठरतात. मात्र, महाराष्ट्राच्या ठाण्याचा अभिजीत पाटील याने वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी, पहिल्याच प्रयत्नात ही कठीण परीक्षा जिंकून दाखविली आहे !

### पहिल्याच प्रयत्नात ऐतिहासिक यश

अभिजीत पाटील याने युपीएससीसीएसी २०२२ मध्ये अखिल भारतीय ४७० वी रँक मिळवली. विशेष बाब म्हणजे कोणतेही कोचिंग क्लास न लावता, केवळ स्व-अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले. २०२३ बॅचचा आयपीएस अधिकारी म्हणून तो आज राजस्थान कॅडरचा सर्वात तरुण आयपीएस अधिकारी ठरला आहे. सध्या तो राजस्थानमधील चुरू




जिल्ह्यातील राजगड येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक (एएसपी) म्हणून कर्तव्य बजावत आहे.

### महाराष्ट्राची माती, देशसेवेची जिद्द

अभिजीतचा जन्म ११ जून १९९९ रोजी ठाणे येथे झाला. वडील तुळशीराम पाटील मुंबई महापालिकेतून मुख्य लेखापरीक्षक म्हणून निवृत्त झालेली आई आशा देवी व सिंचन विभागातील सेवानिवृत्त अधिकारी असलेल्या दोन बहिणींचा एकुलता एक भाऊ असलेला अभिजीत, संस्कार, शिस्त आणि मेहनतीच्या मूल्यांवर घडलेला तरुण आहे.

### कोवळा चेहरा पण पोलादी आत्मविश्वास!

कोवळा चेहरा आणि लहान वय पाहून अनेकांना आजही आश्चर्य वाटते. पण वर्दीतील आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि कर्तव्यनिष्ठा पाहिल्यावर शंका आपोआप नाहीशा होतात. इतक्या कमी वयात कायदा व सुव्यवस्था सांभाळत, अभिजीत पाटील तरुणांसाठी एक जिवंत प्रेरणा ठरत आहे. देशातील सर्वात तरुण आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये सफीन हसन यांच्यासोबत आज अभिजीत पाटील यांचेही नाव अभिमानाने घेतले जाते. स्वप्न मोठे ठेवा वय कधीच अडथळा ठरत नाही.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# नाम व प्रारब्धभोग

नामाचा संबंध प्रारब्धाशी कसा आहे, असे पुष्कळ लोक विचारतात. हा प्रश्न एका दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. बहुतेक लोक प्रारब्ध टळावे म्हणून नाम घेतात. देहाचे सुख-दुःख हे माझेच सुख-दुःख आहे. किंबहुना देह सुखी तर मी सुखी आणि देह दुःखी तर मी दुःखी, अशी सामान्य मनुष्याची अवस्था असते. बरे, प्रारब्धाचे भोग हे आजपर्यंत कोणालाही चुकले नाहीत. मग कसे करावे? येथे असे लक्षात ठेवावे, की प्रारब्धाची गती फक्त देहापुरतीच असते; म्हणून ज्याची देहबुद्धी कमी झाली तो देहाच्या सुख-दुःखाने सुखी वा दुःखी होत नाही. नामाने देहबुद्धी कमी होते म्हणून नामात राहणारा मनुष्य प्रारब्धाचे भोग भोगीत असताना देखील आनंदात असतो. नामाच्या आनंदापुढे त्याला प्रारब्धाची किंमत राहत नाही. नामाचे सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी घडलेले अपराध नाम नाहीसे करते. वाया गेलेल्या माणसांना नाम तारते. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा, पूजेचा राजा आहे.

आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य नामाने लाभते आणि त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते. सर्व काळी, सर्व ठिकाणी, सर्व अवस्थांमध्ये कोणालाही करता येण्यासारखे नाम हेच एक साधन आहे. नामाला उपाधी अत्यंत कमी असल्याने निरुपाधिक भगवंताशी नाते जोडायला नामासारखे साधन नाही. खरोखर किती प्रकारांनी तुम्हाला मी सांगू. अखंड नामात राहणे यालाच मोक्ष म्हणतात. अखंड नामात जगणे यालाच पराभक्ती म्हणतात. जो नामात अखंड गुंतला त्यालाच संत म्हणतात. नामात प्रेम येणे ही संतांची खरी खूणच आहे. तेव्हा माझे एवढे ऐका : नामाला कदापिही विसरू नका. प्रारब्धाच्या भोगांना न कंटाळता, भगवंताने ज्या स्थितीत आपल्याला ठेवले असेल त्यामध्ये समाधान माना, पण केव्हाही त्याच्या नामाला विसरू नका. नामाने पापी माणसे पुण्यवान् बनतात. देहबुद्धी कमी होणे हेच पुण्य होय आणि ते नामाने प्राप्त होते. नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. वाईट किंवा विषयाच्या वासनेने बुद्धी भ्रष्ट करणे हेच कलीचे मुख्य लक्षण होय. त्याच्या मुळावर घाव घालण्याचे काम नाम घेतल्याने होते म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही आणि प्रारब्धाची क्षिती नाही. नामाने पुण्यशरीर बनते. ज्याच्या अंतरात नाम असते तेथे भगवंताला यावे लागल्याने त्याच्या शरीरात सत्त्वगुणाची वाढ होते आणि तो पुण्यवान बनतो. देह प्रारब्धावर टाकून आणि आपण त्याहून निराळे राहून जे होईल त्यात आनंद मानावा. भोग प्रारब्धाने येतात असे म्हणण्यापेक्षा ते भगवंताच्या इच्छेने येतात, असे म्हटले की समाधान मिळेल.

भगवंताला स्मरून काम करीत असताना जे योग्य दिसेल ते त्याच्या इच्छेनेच आहे, असे समजून काम करावे. जो असे करेल त्याला समाधान झालेच पाहिजे.

# सृष्टी अन् मातृत्वाचे प्रतिक असलेले कामाख्या मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आसाम राज्यातील गुवाहाटी येथे असलेले कामाख्या मंदिर हे असे ठिकाण आहे जिथे शक्तीची पूजा त्याच्या सर्वात रहस्यमय आणि अद्वितीय स्वरूपात प्रकट होते. हे मंदिर ५१ शक्तीपीठांमध्ये एक प्रमुख स्थान आहे. जिथे सृष्टी आणि मातृत्वाचे प्रतीक असलेल्या योनीच्या रूपात देवी कामाख्याची पूजा केली जाते. शतकानुशतके गुप्त ठेवलेले माता कामाख्याचे हे आश्चर्यकारक रहस्य उलगडूया.

कामाख्या मंदिराच्या मूळ बांधकामाचा इतिहासात उल्लेख नाही आणि मूळ कामाख्या मंदिर कधी बांधले गेले हे सांगणारे कोणतेही रेकॉर्ड नाहीत. मंदिर आणि देवीबद्दल अनेक दंतकथा आणि लोककथा आहेत. प्राचीन ग्रंथ, कालिका पुराणानुसार, भगवान शिव यांचा विवाह सतीशी झाला होता. मात्र, कामाख्या मंदिराशी संबंधित अशा अनेक रहस्ये, इतिहास आणि चमत्कारांची कहाणी सांगणार आहे, जी तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. हे केवळ एक मंदिर नाही, तर श्रद्धा, शक्ती आणि अनंत रहस्यांचा संगम आहे, जिथे विज्ञान देखील नतमस्तक होते.

कामाख्या मंदिरातील सतीच्या कथेशी संबंधित एक अनोखे रहस्य. कामाख्या मंदिराचा इतिहास केवळ विटा आणि दगडांचा नाही तर आपल्या पौराणिक कथांचे जिवंत उदाहरण आहे. हे मंदिर संपूर्ण विश्वाला हादरवून टाकणाऱ्या सतीच्या कथेशी थेट जोडलेले आहे. पौराणिक कथेनुसार, प्रजापती दक्षाने एक महान यज्ञ आयोजित केला आणि भगवान शिव वगळता सर्व देव-देवतांना आमंत्रित केले. पतीच्या अपमानाने दुःखी झालेली सती तिच्या वडिलांच्या यज्ञात न बोलवता पोहोचली. तिथेही जेव्हा दक्ष शिवाचा अपमान करत राहिला तेव्हा सतीला अपमान सहन झाला नाही आणि तिने यज्ञाच्या अग्नीत उडी मारली आणि आत्महत्या केली. भगवान शिव यांना हे कळताच ते संतापले आणि त्यांनी वीरभद्रला पाठवले ज्याने दक्षाचे डोके त्याच्या शरीरापासून वेगळे केले आणि यज्ञ नष्ट केला. त्यानंतर शिवाने सतीचे जळते शरीर उचलले आणि संपूर्ण विश्वात नाचू लागले. भगवान शिवाचे हे भयंकर रूप पाहून संपूर्ण विश्वात गोंधळ उडाला. देवतांनी शिवाचा क्रोध शांत करण्यासाठी विष्णूला प्रार्थना केली. त्यानंतर भगवान विष्णूने आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या शरीराचे ५१ तुकडे केले. ज्या ठिकाणी हे तुकडे पडले त्या ठिकाणांना शक्तीपीठे म्हणतात. असे मानले जाते, की सतीची



योनी आसाममधील नीलाचल पर्वतावर पडली. येथे कामाख्या मंदिर बांधले गेले. म्हणून, हे मंदिर मातृत्व आणि निर्मितीचे प्रतीक आहे आणि येथे आईची तिच्या योनी स्वरूपात पूजा केली जाते. कामदेवाचा पुनर्जन्म आणि कामाख्या मंदिराची निर्मिती. सतीच्या कथेनंतर, जेव्हा भगवान शिव तीव्र तपश्चर्येत मग्न झाले, तेव्हा देवांमध्ये ताडकासुरची दहशत वाढली. ताडकासुरला ब्रह्माकडून वरदान मिळाले होते की तो फक्त शिवाच्या मुलाद्वारेच मारला जाऊ शकतो. देवतांनी शिवाची तपश्चर्या भंग करण्यासाठी कामदेवाला पाठवले. कामदेवाने शिवावर पुष्प बाण सोडला, ज्यामुळे त्याची तपश्चर्या भंग झाली. क्रोधित शिवाने आपला तिसरा डोळा उघडला आणि कामदेवाला राख केले. हे पाहून कामदेवाची पत्नी रती खूप दुःखी झाली. रती आणि देवतांनी मिळून कामदेवाला पुन्हा जिवंत करण्यासाठी शिवाची प्रार्थना केली. शिव प्रसन्न झाले आणि त्यांनी कामदेवाला पुनर्जीवित केले. मात्र, त्याचे सुंदर रूप परत मिळाले नाही. जेव्हा रती आणि कामदेवांनी त्यांचे सौंदर्य परत मिळवण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा शिवांनी त्यांना नीलाचल पर्वतावर देवीचा आशीर्वाद घेण्यास सांगितले. सतीच्या गुप्तांगावर एक भव्य मंदिर बांधले जाईल. कामदेवांनी शिवाची अट मान्य केली आणि विश्वकर्माच्या मदतीने त्या ठिकाणी एक भव्य मंदिर बांधले. त्यांनी तेथे भैरव आणि ६४ योगिनींच्या मूर्ती देखील स्थापित केल्या. या भक्ती आणि शक्तीमुळे कामदेवाला त्यांचे पूर्ण स्वरूप आणि सौंदर्य परत मिळाले. या कारणास्तव, या मंदिराला कामख्या, कामसाख्या, क्षरखंड, इच्छा पूर्ण करणारी देवी असेही म्हणतात. तेव्हा या मंदिराचे नाव आनंद दाख्या असे ठेवले गेले. असे म्हटले जाते की उमानंद भैरव धामचे मंदिर जिथे भगवान शिव तपश्चर्येत गुंतले होते तिथे बांधले गेले होते. आजही असे मानले जाते, की उमानंद भैरवाला भेट देईपर्यंत कामाख्या देवीचे दर्शन पूर्ण होत नाही. नरकासुराची कपट आणि अर्शी वशिष्ठाचा शाप मित्रांनो, कामाख्या मंदिराशी आणखी एक कथा संबंधित आहे, जी नरकासुर नावाच्या क्रूर राक्षसाची आहे. एक काळ असा होता जेव्हा नरकासुर कामाख्या मंदिरावर राज्य करत होता. तो त्याच्या क्रूरतेसाठी आणि अहंकारासाठी प्रसिद्ध होता. एके दिवशी त्याने माता कामाख्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली, पण मातेने त्याला नकार दिला नाही. त्याऐवजी तिने एक अट घातली: जर तो एका रात्रीत नीलाचल पर्वतावर जाण्यासाठी एक मोठा जिना बांधू शकला, सूर्योदयापूर्वी कोंबडा आरवण्यापूर्वी, तर ती त्याच्याशी लग्न करेल. नरकासुराने ही अट मान्य केली आणि भव्य जिना बांधण्यास सुरुवात केली. तो त्याच्या ध्येयाजवळ पोहोचताच देवीला समजले की तो जिंकेल. त्यानंतर तिने सूर्योदयापूर्वी कोंबड्याला आरवण्यास सांगितले. कोंबड्याचा आरव ऐकून नरकासुरला समजले की तो पैज हरला आहे. रागाच्या भरात त्याने जिना अपूर्ण ठेवला, जो आजही मॅकलिओड मार्ग म्हणून अस्तित्वात आहे. खाली उतरताना त्याला समजले की देवीने त्याला फसवले आहे. या फसवणुकीमुळे संतापून त्याने कोंबडा मारला. ज्या ठिकाणी कोंबडा आरवला होता ते ठिकाण आता कुकुरामुत्था म्हणून ओळखले जाते. त्यानंतर, नरकासुराने कोणालाही देवीच्या दर्शनाला येऊ न देण्याची प्रतिज्ञा केली आणि मंदिराचा मार्ग रोखला. एकदा अयोध्येतील महर्षी वशिष्ठ कामाख्याला भेटायला आले होते, पण नरकासुराने त्यांना थांबवले. अर्शीने नरकासुराचे मन वळवण्याचा प्रयत्न केला तरी तो गप्प राहिला. जेव्हा तो सहमत झाला नाही, तेव्हा रागाच्या भरात आर. सी. वशिष्ठांनी नरकासुराला शाप दिला की तुला भगवान विष्णू मारतील आणि आजपासून माता कामाख्या या मंदिरातून कायमची निघून जाईल. जेव्हा नरकासुर मंदिरात गेला तेव्हा त्याला दिसले की मातृदेवी आधीच निघून गेली आहे. काही काळानंतर, भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला. त्यानंतर, स्थानिक रहिवाशांनी आर्षी वशिष्ठांना देवीला परत आणण्यासाठी प्रार्थना केली. आर्षी म्हणाले की आता मातृदेवीला वामाचर पद्धतीनेच परत आणता येते. त्या दिवसापासून, या मंदिरात वामाचर पद्धत, म्हणजेच बलिदानाची प्रथा सुरू झाली, ज्याद्वारे मातृ कामाख्याची पूजा केली जाते.

# अशा घरावर सदैव राहतो माता लक्ष्मीचा आशीर्वाद कधीच नसते पैशांची कमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुमचे घर कसे असावे? याबद्दल वास्तुशास्त्रामध्ये सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. तुमच्या घराच्या मुख्य दरवाजाच्या दिशेपासून ते तुमच्या घरातील पाण्याची टाकी कोणत्या दिशेला असावी? इथपर्यंत वास्तुशास्त्रात मार्गदर्शन करण्यात आले आहे. हिंदू धर्मशास्त्रामध्ये वास्तुशास्त्राला अत्यंत महत्त्व आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार जर तुमच्या घराची रचना ही वास्तुशास्त्रानुसार नसेल तर तुमच्या घरात वास्तुदोष निर्माण होतात. जेव्हा तुमच्या घरात वास्तुदोष निर्माण होतो. तेव्हा तुम्हाला अनेक प्रकारच्या संकटांचा सामना करावा लागू शकतो. हेच टाळण्यासाठी



वास्तुशास्त्रामध्ये विविध उपाय सांगण्यात आले आहेत. आज आपण अशाच काही गोष्टींबद्दल माहिती जाणून घेणार आहोत. ज्यामुळे तुमच्या घरातील वास्तुदोष दूर होऊन तुमची प्रगती होईल. तुमच्या सर्व प्रकारच्या आर्थिक अडचणी दूर होतील.

**घराचा मुख्य दरवाजा**

वास्तुशास्त्रानुसार तुमच्या घराचा मुख्य दरवाजा हा नेहमी पूर्व किंवा पश्चिम दिशेलाच असावा, जर उत्तर दिशेला असेल तरी चालेल मात्र तो कधीही दक्षिण दिशेला असू नये. घराचा दरवाजा हा पूर्व किंवा पश्चिम दिशेला असणे हे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे घरात नेहमी सकारात्मक उर्जेचा संचार होत राहतो, घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करत नाही, त्यामुळे वास्तुदोषापासून तुमचा बचाव होतो.

**स्वयंपाक घर :**

वास्तुशास्त्रानुसार तुमचे स्वयंपाक घर हे नेहमी अग्नेय दिशेला असावे. कारण अग्नेय दिशा ही अग्नी देवतांची दिशा आहे. त्यामुळे तुमचे किचन जर अग्नेय दिशेला असेल तर ते अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे तुमच्या अनेक समस्या दूर होतात. घरात बरकत राहते, असे वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे.

**घराची उत्तर दिशा :**

वास्तुशास्त्रानुसार तुमच्या घराची उत्तर दिशा ही देखील अत्यंत महत्त्वाची असते, उत्तर दिशा ही धनाची दिशा असते, तसेच ती धनाची देवात कुबेर यांची देखील आवडती दिशा आहे. त्यामुळे तुमच्या घराची उत्तर दिशा ही नेहमी स्वच्छ ठेवावी, त्या दिशेला कधीही कचरा किंवा इतर भंगार सामान टाकू नये, तसेच घराच्या उत्तर दिशेला भिंतीवर कुबेरांचा फोटो लावावा. तुमच्या घराची तिजोरी देखील उत्तर दिशेला असावी, असे वास्तुशास्त्रात सांगण्यात आले आहे.

# कुलदेवीची उपासना आवश्यकच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक कुटुंबाची, प्रत्येक घराण्याची एक कुलदेवी असते. त्या कुलदेवीच्या उपासनेमध्ये फार काही करायला नाही जमले तरी कमीत कमी तीन गोष्टी प्रत्येक कुटुंबाने कराव्यात. कुलदेवी आपल्या कुळाचे रक्षण करीत असल्याने कुलदेवीची उपासना महत्त्वाची असते.

कुटुंबात होणारी मुलांची प्रगती, नोकरी व्यवसायातील बरकत, मुलांचे शिक्षण या सगळ्याच गोष्टी सुरळीत चालाव्यात यासाठी कुलदेवतेची उपासना महत्त्वाची ठरते. कारण कुलदेवी आपल्या संपूर्ण कुळातील सगळ्याच लोकांचे रक्षण करते. त्याचबरोबर सगळ्यांनाच आशीर्वाद देऊन सगळ्यांची प्रगती करवते. पण जर आपण त्या कुलदेवीलाच विसरलो तर आपण तिच्याकडून अपेक्षा तरी काय करावी? म्हणूनच कुलदेवी ही आपल्या कुळाची आई असते आणि आईची सेवा आपल्याकडून झालीच पाहिजे. पण मग खूप काही करायला जमत नसेल तर कमीत कमी तीन गोष्टी आहेत ज्या आपण अगदी सहज करू शकता. त्या तीन गोष्टी कोणत्या आहेत ते पाहणार आहोत. प्रत्येक सणवारानुसार प्रत्येक कुटुंबातील कूळधर्म कुळाचार असतात. त्याचे पालन तर व्हायलाच हवे. पण जर काही कारणाने कूळधर्म कुलाचारात काही चूक होत असेल किंवा ते नीट माहीत नसतील, पाळले जात नसतील तरी सुद्धा कमीत कमी तीन गोष्टींचे पालन करण्याचा प्रयत्न करावा. त्यापैकी सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे कुलदेवतेच्या वारी उपवास करणे. आपली कुलदेवी कुठली आहे तिच्या रूपानुसार, तिच्या वारानुसार उपवास करावा.

जर लक्ष्मीचे रूप असेल तर शुक्रवारी, शक्तीचे स्वरूप असेल तर मंगळवारी याप्रमाणे किंवा शुक्रवारी देवीचे दोनच वार आहेत आणि या दोन्ही वारांपैकी आपल्या कुलदेवीचे रूप ज्याप्रमाणे आहे त्याप्रमाणे उपवास करावा. उपवास आपल्या प्रकृतीला झेपेल याप्रमाणे करावा. कुटुंबातील कुठल्याही एकाने जरी हा उपवास केला आणि कुलदेवतेचे स्मरण त्या दिवशी केले, तरी सुद्धा कुलदेवतेच्या चरणी सेवा रुजू होत असते. कुटुंबप्रमुख असेल किंवा कुटुंबातील प्रमुख स्त्री असेल यापैकी कुणी देखील उपवास करू शकते. आता वळूया दुसऱ्या गोष्टीकडे. दुसरी गोष्ट म्हणजे कुलदेवतेच्या मंत्राचा जप करणे. रोज नाही करायला जमले तरी ज्या दिवशी तुम्ही उपवास करणार आहात त्या दिवशीच तुम्ही कुलदेवीच्या मंत्राचा जप केला तरी चालेल. आता कुलदेवीचा मंत्र काय आहे, हे कसे ओळखायचे.

साधारणपणे 'श्री कुलदेवताय नमः' या मंत्राचा जप तुम्ही करू शकता. पण आपल्याला जर कुलदेवीच्या नावाचा जप करायचा असेल तर काय करायचे? समजा आपली कुलदेवी आहे रेणुका माता, तर 'श्री रेणुका देव नमः' जर आपली कुलदेवता आहे तुळजाभवानी, तर 'श्री तुळजाभवानी देव नमः' याप्रमाणे आपण आपल्या देवींचा मंत्र तयार करून त्याचा जप करू शकता. फार गोंधळ होत असेल तर 'श्री कुलदेवताय नमः' हा अगदी साधा-सोपा मंत्र आहे ज्याचा जप आपण करू शकता. १०८ वेळा या मंत्राचा जप करायचा आहे. ज्या दिवशी आपण उपवास ठेवणार असाल शुक्रवारी किंवा मंगळवारी त्या दिवशी सुद्धा हा जप करू शकता किंवा या मंत्राबद्दल आपण आपल्या घरातील ज्येष्ठ व्यक्ती असतील, कुटुंबाचे कोणी पुरोहित असतील किंवा देवीचे तेथील कोणी पुजारी असतील तर त्यांच्याकडून माहिती सुद्धा करून घेऊ शकता. आता काही जणांचे म्हणणे आहे, की आमची कुलदेवता कोण आहे? तेच आम्हाला माहिती नाही. तर त्यासाठी सोपा उपाय आहे की आपण 'श्री कुलदेवताय नमः' या मंत्राचा जप करा आणि शुक्रवारी किंवा मंगळवारी कोणत्याही एका वारी उपवास करा. दोन्ही वार देवीचेच आहेत. आता वळूया तिसऱ्या गोष्टीकडे की तिसरी गोष्ट कोणती आहे जी करायला हवी तर वर्षातून एकदा तरी कमीत कमी आपल्या कुलदेवीच्या मूळ ठिकाणी जाऊन कुलदेवीचे दर्शन घ्यावे. कुलदेवतेची ओटी भरावी. प्रत्येकालाच हे शक्य होते असे नाही. पण कमीत कमी प्रयत्न करावा की वर्षातून एकदा तरी दोन दिवसांचा वेळ काढून आपल्या कुलदेवीच्या दर्शनाला जावे. बऱ्याचदा कुलदेवी खूप लांब असते घरापासून त्यामुळे जाणे होत नाही. मग कुणाचे लग्न झाले तर किंवा चार-पाच वर्षातून एकदा किंवा काही जण तर अगदी दहा-बारा वर्षातून एकदा कुलदेवीच्या दर्शनाला जातात किंवा अगदी अडचण आली तरच जातात. असे न करता आईच्या भेटीला वर्षातून एकदा तरी जाण्याचा प्रयत्न करावा. कुटुंबामध्ये सुख नांदावे, असे वाटत असेल तर कमीत कमी या तीन गोष्टींचे पालन प्रत्येक कुटुंबाने करायला हवे.

बऱ्याचदा कुटुंबातील मुलांची लग्न ठरत नाहीत किंवा मुलांचा अभ्यासात लक्ष नसते. त्यामुळे ते नीट शिक्षण घेत नाहीत, नोकरी मिळत नाही अशा अनेक अडचणी कुटुंबासमोर उभ्या असतात आणि मग तेव्हा ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र यांची मदत घेतली जाते. नाना प्रकारचे वेगवेगळे उपाय केले जातात. कोणी काय सांगते, कोणी काय सांगते त्याप्रमाणे उपाय केले जातात. बऱ्याचदा हे उपाय खर्चिक सुद्धा असतात. पण आपल्या कुलदेवतेची सेवा आपल्याकडून होते आहे की नाही या गोष्टीकडे मात्र लक्षच दिले जात नाही. सगळे उपाय करण्याआधी कुलदेवीला शरण जावे. आईला आपले गाऱ्हाणे सांगावे. आई आपल्या कुटुंबाला ओळखते. आई आपल्या कुटुंबाचे रक्षण करते आणि ती कुलदेवी आपल्या कुटुंबाला सगळ्या संकटातून तारून नेत असते. त्यामुळे कुलदेवीच्या उपासनेला महत्त्व द्यावे. या तीन गोष्टी ज्या सांगितल्या त्याव्यतिरिक्त तुमचा घराण्यामध्ये असलेला जो काही रीतीरिवाज असेल किंवा कूळधर्म, कुळाचार असेल तो पाळण्याचा सुद्धा प्रयत्न करावा. कारण पारंपरिकपणे मागच्या पिढीकडून चालत आलेले हे रीतीरिवाज हे कूळधर्म, कुळाचार आपल्या कुटुंबाला बांधून ठेवण्याचा प्रयत्न करतात. कुटुंबीयांमध्ये एकी निर्माण करतात आणि मग जेव्हा संकट समोर उभे राहते तेव्हा आपण एकटे नाहीत, ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये असते. म्हणूनच कुलदेवीची उपासना मन लावून करावी. कुठली गोष्ट आपल्याकडून चुकली तर कुलदेवीची क्षमा मागावी. ती आई आहे नक्कीच क्षमा करते. कुठल्याही प्रकारचा मोठा धाक मनात ठेवू नये, भीती मनामध्ये ठेवू नये. आपल्याकडून कुलदेवतेची जेवढी सेवा घडेल तेवढी कमीच असते. कारण कुलदेवतेची सेवा केल्यामुळे आपल्या जीवनात येणाऱ्या अनेक अडचणी दूर होतात. आपल्या घरात लग्न ठरत नसेल, सतत कोणीना कोणी तरी आजारी पडत असेल, आपले मन अस्वस्थ राहत असेल, आपल्याला असुरक्षित वाटत असेल, मुले शिकत नसतील अशा सगळ्या प्रकारच्या समस्यांवर उपाय असतो कुलदेवतेची सेवा करणे. कुलदेवतेची सेवा वेगवेगळ्या प्रकारे केली जाते. त्यातलाच एक भाग आहे कुलदेवतेला कुंकूमार्चन करणे. तुमच्याकडे कुलदेवतेचे टाक असतील किंवा कुलदेवतेचा फोटो असेल तर त्या फोटोला किंवा त्या टाकांवरती तुम्ही कुंकूमार्चन करू शकता.

आता सगळ्यात आधी बघूया, की कुंकूमार्चन करणे म्हणजे नक्की काय? इच्छित देवी-देवतांचा नामजप करत एक-एक चिमूटभर कुंकू त्या मूर्तीवर किंवा फोटोवर चरणांपासून वरपर्यंत वाहत जाणे, हे करताना इच्छित देवी-देवतांचा नाम जप सतत करणे. देवतेला कुंकवाने स्नान म्हणजे कुंकूमार्चन करणे होय. आता देवीचा नाम जप करत-करत एक-एक चिमूटभर कुंकू देवीच्या चरणांपासून प्रारंभ करून तिच्या डोक्यापर्यंत वाहावे अथवा देवीचा नाम जप करत तिला कुंकवाने स्नान घालावे. यालाच कुंकूमार्चन म्हणतात. हे कुंकूमार्चन करताना तुम्ही श्रीसूक्त, देवीसूक्त, नवारण मंत्र, देवी सहस्त्र नामावली, देवी अष्टोत्तरी अशा प्रकारची स्तोत्रे म्हणू शकता किंवा देवीचा एखादा मंत्रही म्हणू शकता. आपल्याला जर कुलदेवतेला कुंकूमार्चन करायचे असेल तर आपण कुलदेवतेचाच मंत्र म्हणणे श्रेष्ठ ठरेल.

आता सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न, की हे कुंकूमार्चन कधी-कधी वर्षातून कमीत कमी एकदा तरी श्रद्धा, भक्तीपूर्ण अंतःकरणाने आपण आपल्या कुलदेवतेला सुद्धा कुंकूमार्चन करायला हवे. ते आपण कधीही करू शकता. अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा, नवरात्र त्याचबरोबर लक्ष्मीपूजन, मंगळवार, शुक्रवार, गुरुपुष्यामृत योग अक्षयतृतीया या शुभ दिवशी आपण देवीला कुंकूमार्चन करू शकता. त्यामुळे आपल्याला निश्चितच लाभ मिळेल. पण अमावास्येला कुंकूमार्चन करू नका. अश्विन नवरात्रात सप्तशतीचे पाठ वाचण्यापूर्वी किंवा पाठ वाचताना जरी कुंकूमार्चन केले तरी सुद्धा ते खूप शुभ फलदायी असते, पुण्यकारक असते.

## कुंकूमार्चन कसे करावे?

कुंकूमार्चन करताना देवीची प्रतिमा अथवा प्रतिकात्मक वस्तू पात्रात घेऊन शूचिर्भूत करून घ्यावी. त्यानंतर मृगी मुद्रेने अर्थात उजव्या हाताचा अंगठा, मधले बोट आणि अनामिका या प्रकारे हातांची मुद्रा करूनच कुंकू देवीला अर्पण करावे. सुरूवात देवीच्या चरणांपासून करावी आणि चरणांपासून मस्तकापर्यंत कुंकू वाहत जावे. कुंकवामध्ये शक्ती तत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता जास्त असते, म्हणूनच देवीच्या मूर्तीला कुंकूमार्चन केल्यावर ती जागृत होते. जागृत मूर्तीतील शक्ती तत्त्व कुंकू येते आणि नंतर ते कुंकू आपण लावल्यावर त्यातील देवीची शक्ती आपल्याला मिळते. मूळ कार्यरत शक्ती तत्त्वाची निर्मिती ही लाल रंगाच्या प्रकाशातूनच झालेली आहे. शक्ती तत्त्वाचे दर्शक म्हणून देवीची पूजा कुंकवाने करतात. कुंकवातून प्रक्षेपित होणाऱ्या गंधलहरींच्या सुवासाकडे ब्रम्हांडातील शक्ती तत्त्वाच्या लहरी अल्पकालावधीतच आकृष्ट होत असल्याने मूर्तीतील सगुण तत्त्वाला जागृत करण्यासाठी लाल रंगाचे दर्शक तसेच देवी तत्त्वाला प्रसन्न करणाऱ्या गंधलहरींचे प्रतीक म्हणून कुंकवाच्या उपचाराला देवीच्या साधने-उपासनेमध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. असे म्हटले जाते की मूळ शक्ती तत्त्वाच्या बीजाचा गंधही कुंकू दरवळणाऱ्या सुवासाशी साधर्म दर्शविणारा असल्याने देवीला जागृत करण्यासाठी कुंकवाचे प्रभावी माध्यम वापरले जाते. पण लक्षात ठेवा, की ते कुंकू नैसर्गिकरित्या बनविलेले असावे. केमिकलयुक्त कुंकू कुंकूमार्चनासाठी वापरू नये. कुंकूमार्चन करून झाल्यानंतर देवीला वाहिलेला तो सगळा कुंकू भरून एका डबीमध्ये ठेवावा आणि तो कुंकू आपण स्वतः आणि घरातील सर्व सदस्यांच्या कपाळावर लावावा. जर घरातील कोणी महत्त्वाच्या कामासाठी बाहेर निघत असेल, तर त्याने अवश्य कुंकूमार्चन केलेला कुंकू लावून बाहेर पडावे. त्यामुळे देवीचा आशीर्वाद आपल्याला मिळतो. तुम्ही रोज सुद्धा सकाळी उठल्यानंतर अंघोळ वगैरे झाल्यावर जेव्हा आवरता तेव्हा हा कुंकू तुम्ही तुमच्या कपाळावर लावू शकता. निश्चितच तुम्हाला त्याचा लाभ होईल. फक्त तो कुंकू पुन्हा देवाला वाहू नका. देवीचा आशीर्वाद म्हणून तो कुंकू आपणच लावायला हवा. तेव्हा तुम्ही सुद्धा वर्षातून एकदा तरी तुमच्या कुलदेवतेला कुंकूमार्चन करा आणि कुलदेवतेचा आशीर्वाद मिळवा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)